रे.मु.नं. १६३८/२०१४ मधील नि.३२ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.४,६ व ७ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादींच्या मते, दावा मिळकती संदर्भातील महत्वाची कागदपत्रे त्यांना न मिळाल्यामूळे कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. तो उशीर मुद्दाम केलेला नाही. त्यांचे पुढे असे कथन आहे कि, दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यात गंभीर तक्रारी आहेत. प्रतिवादींची कैफियत न स्विकारल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे काहीही नुकसान होत नाही. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्याच्या मते अर्जातील कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास एक वर्षाचा विलंब झाला आहे. तो उशीर मुद्दामहून केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा व मंजूर करावयाचा झाल्यास वादीला रक्कम रूपये ७०००/— इतका खर्च मिळावा अशी विनंती केली आहे.

४ उभयपक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तूत प्रतिवादी हे दि. १२/२/२०१५ रोजी सदर दाव्यात हजर झाल्याचे दिसून येते. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास ५ महीन्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींचा अर्ज रक्कम रू. ३००/— इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी वादीस पुढील तारखेपर्यत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.१५.११.२०१७ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

<u>Certificate</u>

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 15/11/2017 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 15/11/2017 |
| Judgment/Order uploaded on | : : | 16/11/2017 |